जिल्हा परिषद अहिल्यानगर , शिक्षण विभाग (प्राथमिक)
दूरध्वनी क्रमांक -०२४१-२३५३६९४
ई-मेल आय डी -ednprimary@gmail.com
वेब साईट - www.edupriamaryanagar.com
पत्ता- नवीन प्रशासकीय इमारत, अहिल्यानगर
पिन कोड- ४१४००१

जा. क्र कार्या २/ आदर्श शाळा/**२२७**/२०२५

अहिल्यानगर दि:- **२४** /**०७**/२०२५

# परिपत्रक

प्रति,

मुख्याध्यापक
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (सर्व )
जिल्हा अहिल्यानगर

द्वारा

गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती सर्व.
जिल्हा अहिल्यानगर.

**विषय** - जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा **"माझी आदर्श शाळा"** म्हणून विकसित करणेबाबत.

संदर्भ - १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: एसएसए -२०१३/प्र. क्र ७५ / प्राशि -४ दि- २९ जून २०१३
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रक क्रमांक - संकीर्ण / २०२० शासन /प्र क्र १४३ / एस डी ६ दि. २६/१०/२०२०.
३.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक -संकीर्ण / २०२०/ प्र क्र १४९ / एस डी ६ दि. ०५/०३/२०२१.
४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक क्रमांक - संकीर्ण / २०२२/ प्र क्र १०४ / एस डी ६ दि: २७/०९/२०२२.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचे पत्र जा क्र. मप्राशिप /सशि/२०२२-२३/३१९१दि. २३/११/२०२२.
६. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: मुमंअ २०२४/प्र. क्र ५२ / एडी-६ दि- २६जुलै २०२४.
७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२१ /प्र. क्र १७९ / एस डी -६ दि- ०५ मार्च २०२५
८. मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेतील मंजूर ठराव दि २१/०७/२०२५.

स्थानिक स्वराज संस्थांच्या शाळा राज्यात आदर्श शाळा म्हणून विकसित करणेसाठी शासन स्तरावरून संदर्भीय शासन निर्णय व परिपत्रके निर्गमित करण्यात आली आहेत या शासन निर्णयात आदर्श शाळांमध्ये आवश्यक सुविधा तसेच आदर्श शाळांचे निकष नमूद आहेत. या माध्यमातून उत्कृष्ट पायाभूत सुविधा,योग्य संसाधने, आनंददायी व उत्साहवर्धक शैक्षणिकदृष्ट्या अनुकूल वातावरण, उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणाऱ्या सर्वसमावेशक व भविष्यवेधी शिक्षण देणाऱ्या आदर्श शाळा विकसित करण्यात येत आहेत.

संदर्भीय शासन निर्णय व UDISE प्रणाली वरील निकषांना अनुसरून अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये जिल्हा परिषदेच्या १०० पेक्षा अधिक पट असलेल्या शाळा या आदर्श शाळा म्हणून विकसित करणेच्या उद्देशाने “माझी आदर्श शाळा" हा उपक्रम सुरु करणेत येत आहे.

"माझी आदर्श शाळा" योजनेस पात्र होणेसाठी खालील नमूद बाबी बंधनकारक राहतील.

१. पटसंख्येतील वाढ
२. BaLA
३. ग्रंथालय
४. रेनवॉटर हार्वेस्टिंग
५. परस बाग

## ➢ योजनेचे स्वरूप : -

१. या शाळा निवड करताना विद्यार्थी पटसंख्या १०० पेक्षा अधिक असावी.
२. शाळेचा समावेश पी एम श्री शाळा, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा इत्यादी योजनेत झालेला नसावा.
३. आदर्श शाळा निर्मितीमध्ये ५ महत्त्वाचे भाग असतील. त्यामध्ये पायाभूत सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता, अभ्यासपूरक उपक्रम, प्रशासकीय बाबी व नावीन्यपूर्ण उपक्रम यांचा समावेश राहील.
४. सदर योजनेचे मूल्यांकन तालुका व जिल्हा स्तरावर केले जाईल व विजेत्या शाळांना सन्मानित केले जाईल.

## ➢ योजनेची उद्दिष्टे: -

१. शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत शाळांच्या पट वाढीस चालना देणे.
२. शाळेत पायाभूत सुविधा विकसित करणे तसेच विद्यमान सुविधांचे सक्षमीकरण करणे.
३. शालेय शिक्षणाच्या दृष्टीकोनातून सर्वाधिक महत्त्वपूर्ण असलेल्या शैक्षणिक संपादणूक या घटकाच्या वृद्धीस प्रोत्साहन देणे.
४. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, क्रीडा इत्यादीबाबत जागृती करणे व नावीन्यपूर्ण उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना देणे.
५. शासनाच्या ध्येय धोरणाशी सुसंगत अशा शालेय प्रशासनाच्या बळकटीकरणास चालना व प्रोत्साहन देणे.

१. **पायाभूत सुविधा** : – [शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: एसएसए -२०१३/प्र. क्र ७५ / प्राशि -४ दि- २९ जून २०१३]

विद्यार्थी दररोज साधारण सहा ते सात तास शाळेत असतात. शाळेतील भौतिक सुविधा उत्तम दर्जाच्या असल्यास विद्यार्थी शाळेकडे आकर्षित होतात व त्यांचे शाळेत मन रमते. शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहून अभ्यासासाठी पूरक वातावरण मिळते. आदर्श शाळेत खालील पायाभूत सुविधा असाव्यात.

१. **आकर्षक शाळा इमारत** : शाळेच्या इमारतीस रंगरंगोटी केलेली असावी. BaLA (Building as Learning Aid ) अंतर्गत इमारतीवर रंगकाम असावे. शाळेचे नाव दर्शनी भागावर असावे. परिसर स्वच्छ असावा.
२. **वर्गखोल्या** : मंजूर शिक्षक संख्येनुसार वर्ग खोल्या असाव्यात सदर वर्गखोल्या स्वच्छ असाव्यात. वर्गातील सजावट बालस्नेही व इयत्तेनुसार असावी.
३. **मुख्याध्यापक कार्यालय** : मुख्याध्यापक कार्यालयात शाळास्तर समित्यांचे फलक/फ्लेक्स, पदाधिकारी - अधिकारी नाम फलक अद्ययावत असावेत.
४. **बेंचेस** : विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे व सुस्थितीतील बेंचेस असावेत.
५. **पेयजल** : विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ व पुरेशा पिण्याच्या पाण्याची सुविधा असावी तसेच वापरासाठी पुरेसे पाणी असावे.
६. **हॅण्डवॉश स्टेशन** : विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात हँडवॉश स्टेशनमध्ये तोट्यांची संख्या असावी. त्याची उंची विद्यार्थ्यांच्या उंचीनुसार असावी , हात धुण्यासाठी साबण /लिक्विड, नॅपकिन ची उपलब्धता असावी .
७. **स्वयंपाकगृह** (किचन शेड) : किचन शेड स्वच्छ असावे. मेनू चार्ट दर्शनी भागात असावा. तांदूळ व धान्यादी मालाची साठवणूक योग्य प्रकारे केलेली असावी. अग्निशमन यंत्र असावे. आहारासाठी वापरात असलेल्या भांड्यांची स्वच्छता असावी.
८. **सी.सी.टी.व्ही**. : इमारतीच्या गरजेनुसार पुरेसे CCTV असावेत . नियमित फुटेज तपासणी असावी.
९. **स्वच्छतागृह :** मुला-मुलींसाठी संख्येनुसार स्वतंत्र स्वच्छतागृहे असावीत. ती स्वच्छ व नियमित वापरात असावीत. विदयुत सुविधा असावी. वाहत्या पाण्याची सुविधा असावी . दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कमोड टॉयलेट/चेअर असावी.
१०.**संरक्षक भिंत** : शाळेच्या सर्व बाजूंनी संरक्षक भिंत असावी व त्यावर BaLA अंतर्गत रंगकाम असावे.
११.**प्रवेशद्वार** शाळेस प्रवेशद्वार / गेट असावे. स्वागत कमान शाळेच्या नावासह असावी .
१२.**विदयुत सुविधा :** विद्युत सुविधा कार्यान्वित असावी तसेच प्रत्येक वर्गात पुरेशा प्रकाशासाठी LED/ट्यूब व पंख्यांची सुविधा असावी. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून विद्युत स्वीच बोर्ड व वायरिंग व्यवस्था असावी.
१३.**आपत्ती व्यवस्थापन** : या अनुषंगाने आराखडा शाळेच्या दर्शनी भागात प्रदर्शित केलेला असावा. आपत्कालीन परिस्थितीत संपर्क करावयाचे क्रमांक दर्शनी भागात असावेत.
१४.**क्रीडांगण** : विविध क्रीडा प्रकारानुसार मैदाने विकसित केलेली असावीत. पुरेसे क्रीडा साहित्य असावे.
१५.**प्रयोगशाळा** : शाळेत संगणक प्रयोगशाळा असावी व २० विद्यार्थ्यांमागे १ संगणक असावा. उच्च प्राथमिक स्तरावर विज्ञान प्रयोगशाळा असावी तसेच भाषा , गणित व खगोलशास्त्र प्रयोगशाळा असाव्यात.
१६.**डिजीटल क्लासरूम :** शाळेत प्रत्येक वर्गात इंटरॅक्टिव्ह पॅनल / बोर्ड /LED/ टॅब इ. सुविधा असाव्यात.

१७.**अडथळ्याविना प्रवेश मार्ग (रॅम्प):** निकषानुसार रॅम्प असावा, रेलिंग असावे.

१८. **अंगणवाडी :** अंगणवाडी शक्यतोवर शालेय परिसरात असावी. [महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एबावि-२०२३/ प्र. क्र. २९८ / का.६ दि ०२ जुलै, २०२५]

**२. शैक्षणिक गुणवत्ता :-** [ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२१ /प्र. क्र १७९ / एस डी -६ दि- ०५ मार्च २०२५]

शाळेची गुणवत्ता चांगली असेल तर विद्यार्थी पटसंख्या टिकून राहते. त्यासोबतच इतरही शाळातील विद्यार्थी अशा शाळांकडे आकर्षित होऊन शाळेची पटसंख्या वाढते. शैक्षणिक गुणवत्तेच्या अनुषंगाने शाळेत खालील बाबी असाव्यात.

१. विद्यार्थी उपस्थिती १००% असावी.
२. सर्व विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान आणि संख्यावरील क्रिया अवगत असाव्यात. शाळा 'निपुण' घोषित असावी.
३. इयत्तानुरूप अपेक्षित अध्ययन निष्पत्ती विद्यार्थ्यांनी साध्य केलेल्या असाव्यात.
४. उपलब्ध शैक्षणिक साहित्याचा नियमित वापर असावा.
५. इंग्रजी विषयातील संभाषण कौशल्य वाढीस लागण्यासाठी विविध उपक्रमांची योजना केलेली असावी.
६. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश चाचणी, शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी व आठवी) , एन.एम.एम.एस. परीक्षा, मिशन आरंभ परीक्षा (इयत्ता ४ थी व ७ वी) यासाठी विद्यार्थ्यांना प्रविष्ठ करून त्यांची आवश्यक तयारी घेतलेली असावी व या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांची संपादणूक उच्च असावी.
७. **वाचन प्रेरणा** - विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात व वयोगटानुसार मराठी व इंग्रजी भाषेतील पुरेशी पुस्तके असावीत. वर्तमानपत्र, मासिके असावीत. ती नियमित वाचनास उपलब्ध करून द्यावीत. दर शनिवारी वाचलेल्या पुस्तकांचे सारांश सांगणे, पुस्तक परीक्षण, सारांश लेखन इत्यादी कृतींचे आयोजन करण्यात यावे. ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली असल्यास उत्तम. पुरेसे फर्निचर असावे जसे कपाट, टेबल, खुर्च्या इत्यादी.
८. SCERT व जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या संकेत स्थळावरील साहित्याचा अध्ययन-अध्यापनात वापर करण्यात येत असावा.

**३. अभ्यासपूरक उपक्रम :-** विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शैक्षणिक गुणवत्तेसोबतच अभ्यासपूरक उपक्रमांचे स्थान महत्त्वाचे आहे. आदर्श शाळांनी खालील उपक्रम राबवावेत.

I) **पर्यावरण शिक्षण**:

१. शाळेत इको क्लबची स्थापना असावी.
२. रेन वॉटर हार्वेस्टिंग केलेले असावे.
३. वृक्षारोपण व संवर्धन केलेले असावे. रोपांना ट्री गार्ड असावे.
४. नावीन्यपूर्ण परसबाग असावी.
५. कचरा व्यवस्थापन केलेले असावे.
६. बालोद्यान असावे.
७. अपारंपारिक ऊर्जा बायोगॅस / सोलरचा वापर असावा.

II) **क्रीडास्पर्धा** : विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकारांचे मार्गदर्शन करून तयारी करून घेतलेली असावी व विविध स्पर्धामध्ये सहभागाची संधी उपलब्ध करून दिलेली असावी.

III) **विविध गुणदर्शन स्पर्धा** : वक्तृत्व, निबंध, गायन, नाट्य, नृत्य, भूमिका अभिनय इ. स्पर्धांचे आयोजन केलेले असावे.

४. **प्रशासकीय बाबी :**

१. शालेय अभिलेख सुस्थितीत, अद्ययावत व वर्गीकृत असावेत.
२. शिक्षकांची उपस्थिती नियमित असावी.
३. सर्व शासकीय योजनांचा लाभ लाभार्थ्यांना दिलेला असावा.
४. लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सेवा वेळेवर पुरविलेल्या असाव्यात.
५. शाळास्तर विविध समित्यांच्या सभा नियमित असाव्यात.
६. परिसरातील शाळेमधून प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध असावी.

५. **नावीन्यपूर्ण उपक्रम:**

नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून खालील मूल्ये शाळेत विद्यार्थ्यांच्या अंगी बाणवावीत.

I. **मूल्ये**

१) संवेदनशीलता
२) वक्तशीरपणा
३) नीटनेटकेपणा
४) सौजन्यशीलता
५) स्त्री-पुरुष समानता
६) श्रमप्रतिष्ठा
७) वैज्ञानिक दृष्टीकोन
८) सर्वधर्म समभाव
९) राष्ट्रभक्ती
१०) राष्ट्रीय एकात्मता

मूल्य शिक्षणासाठीच्या उपक्रमासोबतच विद्यार्थ्यांच्या ज्ञान आणि कौशल्य विकासासाठी उपक्रम जसे की, बाल-संसद, कौशल्य जत्रा, प्रथमोपचार प्रशिक्षण इत्यादी राबविता येईल.

**II. पर्यावरण जाणीव:**

विद्यार्थ्यांच्या अंगी पशु-पक्षी यांच्याबद्दल संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी उपक्रम राबविता येतील जसे की सप्ताहातून एकदा प्रत्येक विद्यार्थ्याने मूठभर धान्य शाळेत गोळा करून पक्ष्यांना खाद्य म्हणून उपलब्ध करून देता येईल. तसेच पक्ष्यांना निवारे शाळेत / परसबागेत निर्माण करता येतील.

बीज बँक (Seed Bank): विद्यार्थी आपल्या परिसरातून वेगवेगळ्या प्रकारच्या बिया गोळा करून शाळेत एक 'बीज बँक' तयार करू शकतील व पावसाळ्यात या बियांचे रोपन करता येईल. याप्रमाणे विविध उपक्रम राबवावेत.

## ➢ निधीचे स्रोत-

आदर्श शाळांमध्ये शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती, नागरिक, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी यांचा उत्तम समन्वय असावा म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था , लोकसहभाग, १५ वा वित्त आयोग व CSR मधून शाळेसाठी आवश्यक सुविधा वस्तू रूपाने उपलब्ध करून घ्याव्यात. तसेच विविध शासकीय योजनांच्या कृती संगमातून शाळा विकसित करता येतील.

## ➢ शाळा मूल्यांकनाचे निकष -

योजनेत सहभागी होऊन एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या शाळांना खालील प्रमाणे गुणांकन देण्यात येईल

**अ) भौतिक सुविधा - ७०गुण.**

**ब) शैक्षणिक गुणवत्ता - १०० गुण.**

**क) अभ्यासपूरक उपक्रम- ४५ गुण.**

**ड) प्रशासकीय बाबी- ३५ गुण.**

**इ ) नावीन्यपूर्ण उपक्रम- ५० गुण.**

मूल्यांकन प्रपत्रामध्ये (शिष्यवृत्ती परीक्षा , जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा, सैनिक स्कूल प्रवेश परीक्षा व NMMS परीक्षा ) हे मुद्दे ज्या संबंधित शाळांना लागू नाहीत त्या शाळांनी त्यांचे मूल्यांकन करू नये. त्यामुळे इयत्ता १ ली ते ४ थी साठी एकूण गुणांकन २७९ गुणांचे , इयत्ता १ ली ते ५ वी व इयत्ता १ ली ते ७ वी साठी एकूण गुणांकन २९८ गुणांचे व इयत्ता १ ली ते ८ वी साठी ३०० गुणांचे होईल. संबंधित शाळेने प्राप्त गुणांची टक्केवारी काढावी .

| **अ) पायाभूत सुविधा** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र** | **निकष** | | **गुणांकन** | **कमाल गुण** |
| १ | **आकर्षक शाळा इमारत व स्वच्छता** | | | **५** |
| | १.१ | शाळेच्या इमारतीस रंगरंगोटी असल्यास | **१** | |
| | १.२ | BaLA (Building as Learing Aid) अंतर्गत इमारतीवर रंगकाम असल्यास | **३** | |
| | १.३ | शाळेचे नाव दर्शनी भागावर असल्यास | **०.५** | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १.४ | परिसर स्वच्छता असल्यास व वर्ग स्वच्छता असल्यास | ०.५ | |
| २ | **वर्गखोल्या व प्रयोगशाळा** | | | ५ |
| | २.१ | शाळेमध्ये वर्गाध्यापनाच्या उद्देशाने पुरेशा वर्ग खोल्या असल्यास | १ | |
| | २.२ | वर्ग सजावट बालस्नेही व इयत्तानुरूप असल्यास | १ | |
| | २.३ | प्रयोगशाळा भाषा, गणित व विज्ञान या तीनही प्रयोगशाळा असल्यास ३ गुण २ प्रयोगशाळा असल्यास २ गुण व १ प्रयोगशाळा असल्यास १ गुण | ३ | |
| ३ | **मुख्याध्यापक कार्यालय** | | | ४ |
| | ३.१ | शाळास्तरा वरील सर्व समित्यांचे अद्ययावत फलक/फ्लेक्स असल्यास | १ | |
| | ३.२ | पदाधिकारी – अधिकारी अद्ययावत नाम फलक असल्यास | १ | |
| | ३.३ | अभिलेखे वर्गीकरण केलेले असल्यास | १ | |
| | ३.४ | मुख्याध्यापक कार्यालय स्वतंत्र असल्यास | १ | |
| ४ | **बेंचेस** | | | २ |
| | ४.१ | विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात सुस्थितीतील बेंचेस (२ विद्यार्थ्यांमागे १ बेंच या प्रमाणे ) असल्यास | १ | |
| | ४.२ | विद्यार्थी वयोगटानुसार तसेच उंचीनुसार बेंचेस असल्यास | १ | |
| ५ | **पेयजल व वापराचे पाणी** | | | ३ |
| | ५.१ | विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ व पुरेशा पिण्याच्या पाण्याची सुविधा असल्यास | १ | |
| | ५.२ | पाणी शुद्धतेची स्वतंत्र व्यवस्था असल्यास | १ | |
| | ५.३ | पाणी साठवण्याची पुरेशी व्यवस्था असल्यास | १ | |
| ६ | **हॅण्डवॉश स्टेशन** | | | ३ |
| | ६.१ | विद्यार्थ्यांच्या उंचीनुसार हॅण्डवॉश स्टेशन असल्यास | १ | |
| | ६.२ | विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात हॅण्डवॉश स्टेशन मध्ये तोट्यांची संख्या असल्यास (२० मुलांमागे १ याप्रमाणे ) | १ | |
| | ६.३ | हात धुण्यासाठी साबण /लिक्विड, नॅपकिन ची उपलब्धता असल्यास | १ | |
| ७ | **स्वयंपाकगृह (किचन शेड)** | | | ५ |
| | ७.१ | स्वतंत्र व स्वच्छ किचन शेड असल्यास | १ | |
| | ७.२ | दर्शनी भागात मेनू चार्ट प्रदर्शित केला असल्यास | १ | |
| | ७.३ | तांदूळ व धान्यादी मालाची सुयोग्य साठवणूक केली असल्यास | १ | |
| | ७.४ | अग्निशमन यंत्र रिफिल केलेले असल्यास | १ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ७.५ | आहार शिजवण्यासाठी व खाण्यासाठी वापरात असलेल्या भांड्यांची स्वच्छता असल्यास | १ | |
| ८ | **सीसीटीव्ही व तक्रार पेटी** | | | ४ |
| | ८.१ | इमारतीच्या गरजेनुसार पुरेसे CCTV असल्यास | २ | |
| | ८.२ | नियमित फुटेज तपासणी केली जात असल्यास | ०.५ | |
| | ८.३ | तक्रारपेटी विद्यार्थ्यांच्या उंचीचा विचार करून बसविलेली असल्यास | ०.५ | |
| | ८.४ | तक्रार निवारणाबाबत कार्यवाही केलेली असल्यास | १ | |
| ९ | **आरोग्य सेवा आणि व्यवस्थापन** | | | ४ |
| | ९.१ | नियमित वार्षिक आरोग्य तपासणी झालेली असल्यास | १ | |
| | ९.२ | संदर्भित विद्यार्थ्यांसाठी सेवा/ साधने पुरविला असल्यास | १ | |
| | ९.३ | प्रथमोपचार पेटी पुरेशा साहित्यासह उपलब्ध असल्यास | १ | |
| | ९.४ | सिक रूम असल्यास | १ | |
| १० | **स्वच्छतागृह** | | | ५ |
| | १०.१ | मुला – मुलींसाठी निकषानुसार स्वतंत्र स्वच्छतागृह असल्यास | १ | |
| | १०.२ | स्वच्छतागृहाचा नियमित वापर होत असल्यास | १ | |
| | १०.३ | नियमित स्वच्छता राखली जात असल्यास | १ | |
| | १०.४ | स्वच्छतागृहातील विदयुत सुविधा कार्यान्वित असल्यास | १ | |
| | १०.५ | दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कमोड टॉयलेट/चेअर असल्यास | १ | |
| ११ | **संरक्षक भिंत** | | | ५ |
| | ११.१ | सर्व बाजूंनी संरक्षक भिंत असल्यास | ३ | |
| | ११.२ | संरक्षक भिंतीवर बाला अंतर्गत रंगकाम असल्यास | २ | |
| १२ | **प्रवेशद्वार** | | | १ |
| | १२.१ | शाळेस प्रवेशद्वार / गेट असल्यास | १ | |
| १३ | **विदयुत सुविधा** | | | ४ |
| | १३.१ | विद्युत सुविधा कार्यान्वित असल्यास | १ | |
| | १३.२ | प्रत्येक वर्गात पुरेशा प्रकाशासाठी LED/ट्यूब असल्यास | १ | |
| | १३.३ | प्रत्येक वर्गात पंख्यांची सुविधा असल्यास | १ | |
| | १३.४ | विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून विद्यूत स्वीच बोर्ड व वायरिंग असल्यास | १ | |
| १४ | **आपत्ती व्यवस्थापन** | | | ५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १४.१ | आपत्कालीन परिस्थितीत संपर्क करावयाचे क्रमांक दर्शनी भागात प्रदर्शित केले असल्यास | १ | |
| | १४.२ | आपत्ती व्यवस्थापना संदर्भात Mock Drill घेतले असल्यास | १ | |
| | १४.३ | शाळेने आग भूकंप साथीचे रोग आणि इतर क्षेत्रांशी संबंधित किमान एक आपत्ती व्यवस्थापन योजना विकसित केलेली असल्यास व ती दर्शनी भागात प्रदर्शित केली असल्यास . | १ | |
| | १४.४ | शाळेने वर्षातून किमान एकदा सुरक्षा ऑडिट केले असल्यास | १ | |
| | १४.५ | शालेय सुरक्षा प्रतिज्ञा दर्शनी भागात प्रदर्शित केली असल्यास | १ | |
| १५ | **क्रीडांगण** | | | ४ |
| | १५.१ | विविध क्रीडा प्रकारानुसार मैदाने विकसित केलेली असल्यास | २ | |
| | १५.२ | पुरेसे क्रीडा साहित्य उपलब्ध असल्यास | २ | |
| १६ | **डिजीटल क्लासरूम** | | | ५ |
| | १६.१ | प्रत्येक वर्गात इंटरॅक्टिव्ह पॅनल बोर्ड/ LED / प्रोजेक्टर असल्यास | ३ | |
| | १६.२ | प्रत्येक वर्गात विद्यार्थी संख्येनुसार टॅब (१० मुलांमागे एक असल्यास) | २ | |
| १७ | **अडथळ्याविना प्रवेश मार्ग ( रॅम्प )** | | | १ |
| | १७.१ | निकषानुसार रॅम्प असल्यास | ०.५ | |
| | १७.२ | निकषानुसार रेलिंग असल्यास | ०.५ | |
| १८ | **अंगणवाडी** | | | १ |
| | १८.१ | शालेय परिसरात अंगणवाडी असल्यास | १ | |
| १९ | **संगणक प्रयोगशाळा** | | | ४ |
| | १९.१ | २० मुलांमागे १ संगणक या प्रमाणे पुरेशा फर्निचरसह संगणक प्रयोगशाळा उपलब्ध असल्यास | १ | |
| | १९.२ | संगणक प्रयोगशाळा नियमित वापर होत असल्यास | २ | |
| | १९.३ | शाळेत कार्यरत इंटरनेट सुविधा / WIFI सुविधा उपलब्ध असल्यास | १ | |
| **एकूण गुण (अ)** | | | | **७०** |

**ब) शैक्षणिक गुणवत्ता**

| अ. क्र | निकष | गुणांकन | कमाल गुण |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **मागील वर्षाच्या तुलनेत चालू शैक्षणिक वर्षात झालेली पटसंख्या वाढ, पटनोंदणी ,पूर्व प्राथमिक शिक्षणातील सहभाग, गळती कमी करण्यासाठीचे प्रयत्न** | | ७ |
| | १.१ मागील वर्षाच्या तुलनेत चालू शैक्षणिक वर्षात पटसंखेमध्ये वाढ झाली असल्यास. | ३ | |
| | १.२ पटनोंदणी- दाखलपात्र सर्व विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेत दाखल असल्यास २ गुण . (दाखलपात्र पैकी काही विद्यार्थी इतर शाळेत दाखल असल्यास १ गुण द्यावा ) | २ | |
| | १.३ पूर्व प्राथमिक शिक्षणातील सहभाग असल्यास (मुख्याध्यापक/ शिक्षक यांनी अंगणवाडी मध्ये मार्गदर्शन केले असल्यास ) | १ | |
| | १.४ शून्य टक्के गळती असल्यास | १ | |
| २ | **वार्षिक सरासरी-विद्यार्थी उपस्थिती** | | ४ |
| | २.१.१ ९५ ते १०० टक्के | ४ | |
| | २.१.२ ८५ ते ९५ टक्के | ३ | |
| | २.१.३ ७५ ते ८५ टक्के | २ | |
| | २.१.४ ६० ते ७५ टक्के | १ | |
| ३ | **निपुण शाळा / वर्ग** | | ५ |
| | ३.१.१ शाळा निपुण घोषित असल्यास | ५ | |
| | ३.१.२ शाळेतील ५० % वर्ग निपुण घोषित असल्यास | ३ | |
| | ३.१.३ शाळेतील ५० % पेक्षा कमी वर्ग निपुण घोषित असल्यास | १ | |
| ४ | **अध्ययन निष्पत्ती** | | ५ |
| | ४.१.१ इयत्तानुरूप अपेक्षित अध्ययन निष्पत्ती- सर्व वर्ग ,सर्व विषय ९० टक्के पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना अध्ययन निष्पत्ती प्राप्त असल्यास | ५ | |
| | ४.१.२ ८० ते ९० टक्के विद्यार्थ्यांना प्राप्त असल्यास | ३ | |
| | ४.१.३ ८० टक्के पेक्षा कमी विद्यार्थ्यांना प्राप्त असल्यास | २ | |
| ५ | **नियतकालिक मूल्यांकन चाचण्या (PAT)** | | १ |
| | ५.१ PAT चे गुण chat bot वर नोंदविले असल्यास | १ | |
| ६ | **उपलब्ध शैक्षणिक साहित्याचा नियमित वापर** | | २ |
| | ६.१ सर्व वर्गात भाषा पेटीचा नियमित वापर असल्यास | १ | |
| | ६.२ सर्व वर्गात गणित पेटी नियमित वापर असल्यास | १ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | **मिशन आरंभ निकाल** (उच्च प्राथमिक शाळा असल्यास इयत्ता ४ थी व ७ वीच्या निकालाची सरासरी काढावी व मूल्यांकन करावे ) गतवर्षीचा निकाल पाहावा | | | ११ |
| | ७.१.१ | ९० टक्के पेक्षा अधिक निकाल | ५ | |
| | ७.१.२ | ८० ते ९० टक्के निकाल | ४ | |
| | ७.१.३ | ७० ते ८० टक्के निकाल | ३ | |
| | ७.१.४ | ६० ते ७०टक्के निकाल | २ | |
| | ७.१.५ | ५० ते ६० टक्के निकाल | १ | |
| | ७.१.६ | ५० टक्के पेक्षा कमी निकाल | ० | |
| | ७.२ | जिल्हा परिषद मार्फत आयोजित सर्व सराव परीक्षांचे विश्लेषण विद्यार्थीनिहाय व विषयनिहाय केले असल्यास | २ | |
| | ७.३ | जिल्हा गुणवत्ता यादीत २ ते ५ विद्यार्थी असल्यास २ गुण द्यावेत , ६ ते १० विद्यार्थी असल्यास ३ गुण द्यावेत व १० पेक्षा जास्त विद्यार्थी असल्यास ४ गुण द्यावेत | ४ | |
| ८ | **शिष्यवृत्ती धारक NMMS** (इयत्ता १ ते ४ / १ ते ५ व १ ते ७ लागू नाही)गतवर्षीचा निकाल पाहावा | | | २ |
| | ८.१ | शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी असल्यास | २ | |
| ९ | **शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ५ वी व ८ वी** (उच्च प्राथमिक शाळा असल्यास दोन्ही इयत्तांची सरासरी करून गुणांकन करावे) (इयत्ता १ ते ४ साठी लागू नाही ) गतवर्षीचा निकाल पाहावा | | | १४ |
| | ९.१.१ | ९० टक्के पेक्षा अधिक निकाल | ५ | |
| | ९.१.२ | ८० ते ९० टक्के निकाल | ४ | |
| | ९.१.३ | ७० ते ८० टक्के निकाल | ३ | |
| | ९.१.४ | ६० ते ७०टक्के निकाल | २ | |
| | ९.१.५ | ५० ते ६० टक्के निकाल | १ | |
| | ९.१.६ | ५० टक्के पेक्षा कमी निकाल | ० | |
| | ९.२ | जिल्हा परिषद मार्फत आयोजित सर्व सराव परीक्षांचे विश्लेषण विद्यार्थीनिहाय व विषयनिहाय केले असल्यास | २ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ९.३ | जिल्हा गुणवत्ता यादीत २ ते ५ विद्यार्थी असल्यास २ गुण द्यावेत , ६ ते १० विद्यार्थी असल्यास ३ गुण द्यावेत व १० पेक्षा जास्त विद्यार्थी असल्यास ४ गुण द्यावेत | ४ | |
| | ९.४ | राज्य गुणवत्ता यादी किमान एक विद्यार्थी असल्यास | ३ | |
| १० | **सैनिक स्कूल प्रवेश परीक्षा** (इयत्ता १ ते ४ लागू नाही) गतवर्षीच्या निकाल पाहावा | | | २ |
| | १०.१ | विद्यार्थ्यांची निवड झाली असल्यास २ गुण द्यावेत. | २ | |
| ११ | **नवोदय विद्यालय प्रवेश निवड** (इयत्ता १ ते ४ लागू नाही) गतवर्षीच्या निकाल पाहावा | | | ३ |
| | ११.१ | नवोदय विद्यालय प्रवेश निवड २ ते ५ विद्यार्थी असल्यास २ गुण द्यावेत , ५ पेक्षा जास्त विद्यार्थी असल्यास ३ गुण द्यावेत | ३ | |
| १२ | **वाचन प्रेरणा** | | | २५ |
| | १२.१ | शाळेत ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली असल्यास | १ | |
| | १२.२ | पुस्तक संख्या प्रति विद्यार्थी ५ किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास | ५ | |
| | १२.३ | पुस्तक देव घेव रजिस्टर असल्यास | २ | |
| | १२.४ | वर्तमानपत्र, मासिके वाचनास उपलब्ध करून दिले असल्यास | २ | |
| | १२.५ | बहुभाषिक पुस्तके उपलब्ध असल्यास | १ | |
| | १२.६ | इंग्रजी (निबंध स्पर्धा २ गुण, वक्तृत्व स्पर्धा २ गुण, संभाषण २ गुण व कथाकथन २ गुण) | ८ | |
| | १२.७ | पुस्तके ठेवण्यासाठी फर्निचर असल्यास | १ | |
| | १२.८ | ग्रंथालयात वाचनासाठी बालस्नेही बैठक व्यवस्था असल्यास | ३ | |
| | १२.९ | वाचलेल्या पुस्तकांचा सारांश कथन करणे बाबत कार्यवाही केली असल्यास | २ | |
| १३ | **शिक्षक सहभाग** | | | १९ |
| | १३.१ | SCERT मार्फत होणाऱ्या स्पर्धेत शिक्षकांचा सहभाग असल्यास | २ | |
| | १३.२.१ | SCERT मार्फत होणाऱ्या प्रशिक्षणात राज्य स्तरावर प्रशिक्षण घेतले असल्यास | ३ | |
| | १३.२.२ | SCERT मार्फत होणाऱ्या प्रशिक्षणात जिल्हा स्तरावर प्रशिक्षण घेतले असल्यास | २ | |
| | १३.२.३ | SCERT मार्फत होणाऱ्या प्रशिक्षणात तालुका स्तरावर प्रशिक्षण घेतले असल्यास | १ | |
| | १३.३ | विद्यार्थी समूह (वर्ग निहाय व विषय निहाय) निर्मिती केली असल्यास | १ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १३.४ | १३० च्या पुढे IQ असणारे (प्रतिभावंत) मुले शोध (GIFTED STUDENTS) | २ | |
| | १३.५ | IGOT Karmayogi पोर्टलवर १००% शिक्षकांची नोंदणी असल्यास | १ | |
| | १३.६.१ | IGOT Karmayogi पोर्टलवर प्रशिक्षण - शाळेतील सर्व शिक्षकांनी प्रत्येकी ५ प्रशिक्षण पूर्ण केले असल्यास | ४ | |
| | १३.६.२ | IGOT Karmayogi पोर्टलवर प्रशिक्षण - शाळेतील सर्व शिक्षकांनी प्रत्येकी ४ प्रशिक्षण पूर्ण केले असल्यास | ३ | |
| | १३.६.३ | IGOT Karmayogi पोर्टलवर प्रशिक्षण - शाळेतील सर्व शिक्षकांनी प्रत्येकी ३ प्रशिक्षण पूर्ण केले असल्यास | २ | |
| | १३.६.४ | IGOT Karmayogi पोर्टलवर प्रशिक्षण - शाळेतील सर्व शिक्षकांनी प्रत्येकी २ प्रशिक्षण पूर्ण केले असल्यास | १ | |
| | १३.६.५ | IGOT Karmayogi पोर्टलवर प्रशिक्षण - निकषाप्रमाणे प्रशिक्षण पूर्ण केले नसल्यास ० गुण द्यावा | ० | |
| | १३.७ | प्रश्नपेढीचा वापर (SCERT वेबसाईट) असल्यास | २ | |
| | १३.८ | शैक्षणिक दिनदर्शिका वापर (SCERT वेबसाईट) असल्यास | २ | |
| | १३.९ | R२ इंग्रजी व्हिडीओचा अध्यापनात वापर (SCERT वेबसाईट) असल्यास | २ | |
| **एकूण गुण (ब)** | | | | १०० |
| **क) अभ्यासपूरक उपक्रम** | | | | |
| **अ. क्र** | **निकष** | | **गुणांकन** | **कमाल गुण** |
| १ | **पर्यावरण शिक्षण** | | | १५ |
| | १.१ | शाळेत इको क्लब ची स्थापना व कार्यान्वयन असल्यास | ३ | |
| | १.२ | रेन वॉटर हार्वेस्टिंग असल्यास | २ | |
| | १.३ | वृक्षारोपण व संवर्धन केलेले / रोपांना ट्री गार्ड असल्यास | २ | |
| | १.४ | नावीन्य परसबाग असल्यास | २ | |
| | १.५ | कचरा व्यवस्थापन केले असल्यास | २ | |
| | १.६ | बाल उदयान असल्यास | १ | |
| | १.७ | अपारंपरिक उर्जा (उदा. Bio Gass, Solar etc.) वापर असल्यास | २ | |
| | १.८ | सांडपाणी व्यवस्थापन असल्यास | १ | |
| २ | **कला / क्रीडास्पर्धा** | | | १० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २.१ | संरचित मैदान असल्यास | २ | |
| | २.२ | खेळाचे साहित्य उपलब्ध असल्यास | २ | |
| | २.३ | शाळास्तर क्रीडा स्पर्धा अयोजित केल्या असल्यास | २ | |
| | २.४ | तालुका स्तर क्रीडा स्पर्धेत सहभाग असल्यास | १ | |
| | २.५ | जिल्हास्तर क्रीडा स्पर्धेत सहभाग असल्यास | १ | |
| | २.६ | विभाग / राज्य / राष्ट्रीय स्तर क्रीडा स्पर्धेत सहभाग | १ | |
| | २.७ | बालचित्रकला/ इलिमेंटरी / इंटरमिजिएट / स्पर्धेत सहभाग | १ | |
| ३ | **विविध गुणदर्शन स्पर्धा** | | | २० |
| | ३.१ | वर्ग स्तर स्पर्धा - मराठी वक्तृत्व , निबंध, हस्ताक्षर, गायन, चित्रकला, वेषभूषानुसार सादरीकरण, कथा कथन, नाट्यीकरण , नृत्य, शब्दावरून गोष्ट तयार करणे स्पर्धांचे आयोजन (प्रत्येकी २ गुण ) | २० | |
| | | **एकूण गुण (क)** | | ४५ |
| **ड) प्रशासकीय बाबी** | | | | |
| **अ. क्र** | | **निकष** | **गुणांकन** | **कमाल गुण** |
| १ | **शालेय अभिलेख** | | | ३५ |
| | १.१ | प्रत्येक शिक्षकाचे विदयार्थी विषयक अभिलेखांचे अद्ययावतीकरण (CCE निरीक्षण नोंदी व गुणदान, BMI , HPC, दैनिक हजेरी, अध्यापनाचे वेळापत्रक ) असल्यास | ५ | |
| | १.२ | MDM उपस्थिती नियमित नोंदणी असल्यास | २ | |
| | १.३ | सरल पोर्टल वरील नोंदी अद्ययावत असल्यास | २ | |
| | १.४ | UDISE + प्रणाली नोंदी अद्ययावत असल्यास | २ | |
| | १.५ | VSK Chat Bot (उपस्थिती नोंदणे) नोंदी अद्यावत असल्यास | २ | |
| | १.६ | निपुण App माहिती अद्ययावतीकरण असल्यास | २ | |
| | १.७ | माता गट स्थापना व कार्यान्वयन असल्यास | २ | |
| | १.८ | १००% विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नोंदणीचे काम केले असल्यास २ गुण , १००% पेक्षा कमी असल्यास १ गुण द्यावा | २ | |
| | १.९ | विद्यार्थ्यांचे १०० % अपार आयडी असल्यास २ गुण , १००% पेक्षा कमी असल्यास १ गुण द्यावा | २ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १.१० | वर्गनिहाय पालक सभा दरमहा घेतल्या असल्यास | २ | |
| | १.११ | शिक्षकांची उपस्थिती नियमित असल्यास | २ | |
| | १.१२ | समग्र व सर्व शासकीय योजनांचा लाभ लाभार्थ्यांना दिला असल्यास | २ | |
| | १.१३ | लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सेवा वेळेवर पुरविल्याचे अभिलेखे असल्यास | २ | |
| | १.१४ | माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अभिलेखे अद्ययावत असल्यास | २ | |
| | १.१५ | विविध समित्यांच्या सभा नियमित घेणे व त्यासंबंधी अभिलेखे असल्यास | २ | |
| | १.१६ | परिसरातील शाळेमधून प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध असल्यास | २ | |
| | | **एकूण गुण (ड)** | | **३५** |
| | | | | |

**इ ) नावीन्यपूर्ण उपक्रम**

| **अ. क्र** | **निकष** | **गुणांकन** | **कमाल गुण** |
|---|---|---|---|
| १ | संवेदनशीलता, वक्तशीरपणा ,नीटनेटकेपणा , वैज्ञानिक दृष्टीकोन, सौजन्यशीलता, श्रमप्रतिष्ठा, स्त्री-पुरुष समानता, सर्वधर्म समभाव, राष्ट्रभक्ती व राष्ट्रीय एकात्मता- या १० मूल्यांपैकी कोणत्याही ५ मूल्यांवर आधारित प्रत्येकी किमान एक प्रभावी उपक्रम नियमित राबविला असल्यास (प्रति मूल्यावर आधारित उपक्रमास ३ गुण या प्रमाणे गुण द्यावेत ) | **१५** | **१५** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | **इतर उपक्रम** | | | **३५** |
| | १२.१ | विज्ञान मेळावा घेतला असल्यास | २ | |
| | १२.२ | रोबोटिक्स लॅब स्थापन केली असल्यास | २ | |
| | १२.३ | FIT India उपक्रमात सहभाग घेतला असल्यास | १ | |
| | १२.४ | वार्षिक खेळ दिवस साजरा केला असल्यास | १ | |
| | १२.५ | वार्षिक स्नेह संमेलन घेतले असल्यास | २ | |
| | १२.६ | खगोल प्रयोगशाळा स्थापित केली असल्यास | २ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १२.७ | शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय प्रथमोपचार प्रशिक्षण आयोजित केले असल्यास | १ | |
| | १२.८ | विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन कार्यक्रम आयोजित केले असल्यास | १ | |
| | १२.९ | नजीकचे डॉक्टर / दवाखाने यासोबत ऑन कॉल सेवेसाठी सामंजस्य करार असल्यास | १ | |
| | १२.१० | मासिक पाळी व्यवस्थापन संबंधी कार्यक्रम (व्याख्यान , सॅनेटरी पॅड उपलब्धता , Incinator सुविधा ) केले असल्यास | १ | |
| | १२.११ | विद्यार्थीनींना स्व संरक्षण प्रशिक्षण दिले असल्यास | १ | |
| | १२.१२ | निवडणूक साक्षरता व मतदार जागृतीसाठी उपक्रम आयोजित केले असल्यास | १ | |
| | १२.१३ | नवभारत साक्षरता मध्ये असाक्षरांची नोंदणी केली असल्यास | १ | |
| | १२.१४ | व्यसनमुक्ती उपक्रम आयोजित केले असल्यास | १ | |
| | १२.१५ | योग / प्राणायाम आयोजन केले असल्यास | १ | |
| | १२.१६ | लेझीम पथक / बँड पथक कार्यान्वित असल्यास | २ | |
| | १२.१७ | कवायत घेतली जात असल्यास | १ | |
| | १२.१८ | स्काऊट-गाईड / कब- बुलबुल युनिट सुरु असल्यास | २ | |
| | १२.१९ | क्षेत्रभेट आयोजन केले असल्यास | २ | |
| | १२.२० | सायबर सुरक्षा व्याख्यान आयोजित केले असल्यास | १ | |
| | १२.२१ | शैक्षणिक सहल आयोजित केली असल्यास | २ | |
| | १२.२२ | शालेय मंत्रिमंडळ स्थापना केले असल्यास | १ | |
| | १२.२३ | विविध शाळास्तर कार्यक्रमांचे विद्यार्थ्यांद्वारे संचलन (परिपाठ, महापुरुष जयंती- पुण्यतिथी, स्नेह संमेलन शालेय कार्यक्रम ) होत असल्यास | २ | |
| | १२.२४ | प्रश्नमंजुषा आयोजित केली असल्यास | १ | |
| | १२.२५ | प्रज्ञावंतांच्या मुलाखती (विविध क्षेत्रातील प्रज्ञावंत) एक पेक्षा जास्त मुलाखती घेतल्यास | २ | |
| **एकूण गुण (इ)** | | | | ५० |
| **महान एकूण गुण (अ) + (ब) + (क) + (ड) +(इ)** | | | | ३०० |

## ➢ मूल्यांकन समित्या –

**तालुकास्तरावरील मूल्यांकन समिती-**

| अं.क्र | पदनाम व कार्यालय | पद |
|---|---|---|
| १ | गटविकास अधिकारी,पंचायत समिती | अध्यक्ष |
| २ | गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती | सदस्य |
| ३ | अधीक्षक पी एम पोषण | सदस्य |
| ४ | सेवाजेष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण) | सदस्य सचिव |

**तालुकास्तर मूल्यांकन समितीचे कार्य –**

१. तालुका स्तरावरील मूल्यांकनाचे कार्य तालुकास्तर मूल्यांकन समिती करेल.
२. सदर समितीस पथक निर्मितीचे अधिकार असतील.
३. क्षेत्रीय अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यक्षेत्रात मूल्यांकन करता येणार नाही. या प्रमाणे पथकांचे नियोजन करावे.
४. तालुकास्तरावर प्रथम क्रमांकाची शाळा घोषित केली जाईल जी जिल्हास्तरीय मूल्यांकनासाठी पात्र ठरेल.

**जिल्हास्तरावरील मूल्यांकन समिती-**

| अं.क्र | पदनाम व कार्यालय | पद |
|---|---|---|
| १ | मुख्यकार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद | सदस्य |
| ३ | उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) | सदस्य |
| ४ | विस्तार अधिकारी (शिक्षण) | सदस्य सचिव |

**जिल्हास्तर मूल्यांकन समितीचे कार्य –**

१. जिल्हा स्तरावरील मूल्यांकनाचे कार्य जिल्हास्तर मूल्यांकन समिती करेल.
२. सदर समितीस पथक निर्मितीचे अधिकार असतील.
३. प्रत्येक तालुक्यातील निवडलेल्या शाळांची पथकामार्फत तपासणी / मूल्यांकन करेल.
४. जिल्हास्तरावरील प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाच्या शाळा घोषित करेल.

➢ पारितोषिकाचे स्वरूप-

I. **तालुकास्तर पारितोषिक-** निवड झालेल्या शाळेस रोख रक्कम रुपये ११,०००/- (अक्षरी रक्कम रुपये अकरा हजार मात्र) रक्कम व प्रशस्तीपत्रक.

II. **जिल्हास्तर पारितोषिक-**

i. प्रथम क्रमांकाच्या शाळेस रोख रक्कम रुपये ७१,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एकाहत्तर हजार मात्र) रक्कम व प्रशस्तीपत्रक.

ii. द्वितीय क्रमांकाच्या शाळेस रोख रक्कम रुपये ५१,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक्कावन्न हजार मात्र) रक्कम व प्रशस्तीपत्रक.

iii. तृतीय क्रमांकाच्या शाळेस रोख रक्कम रुपये ३१,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एकतीस हजार मात्र) रक्कम व प्रशस्तीपत्रक.

जिल्हास्तरावरील पारितोषिक मिळणाऱ्या तीन शाळांना तालुकास्तरावरील पारितोषिकाची रक्कम देय राहणार नाही केवळ प्रशस्तीपत्रक देण्यात येईल. पारितोषिकासाठीची रक्कम व जिल्हास्तरीय पारितोषिक वितरण कार्यक्रम यासाठी येणारा खर्च जिल्हा परिषद स्वनिधी मधून भागविण्यात येईल.

सदर परिपत्रक अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रं.202507241600 70 असा आहे.

(आनंद भंडारी भा. प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर